# जाहिर नोटीस

## रत्नागिरी येथील जिल्हा न्यायालयात,

या जाहिर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की,

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचे अधिपत्याखालील दिवाणी न्यायालय क.स्तर, खेड, दिवाणी न्यायालय क.स्तर, दापोली, दिवाणी न्यायालय क.स्तर, गुहागर, दिवाणी न्यायालय क.स्तर, लांजा व जिल्हा न्यायालय, रत्नागिरी (अभिलेख कक्ष) येथे पुरविणेत आलेले कॅनन कंपनीचे iR 2006 N हे झेरॉक्स मशीन तसेच जिल्हा न्यायालय—१, चिपळुण व दिवाणी न्यायालय व.स्तर, खेड येथील कॅनन कंपनीचे iR 2625 N या झेरॉक्स मशीनचा Non Comprehensive वार्षिक देखभाल करार करणे आवश्यक असल्याने याद्वारे निविदा मागविणेत येत आहेत.

तरी ज्या कोणा व्यक्ती अथवा संस्थेस वर नमुद केलेप्रमाणे जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचे अधिपत्याखालील दिवाणी न्यायालय क.स्तर, खेड, दिवाणी न्यायालय क.स्तर, दापोली, दिवाणी न्यायालय क.स्तर, गुहागर, दिवाणी न्यायालय क.स्तर, लांजा व जिल्हा न्यायालय, रत्नागिरी (अभिलेख कक्ष) येथे पुरविणेत आलेले कॅनन कंपनीचे iR 2006 N हे झेरॉक्स मशीन तसेच जिल्हा न्यायालय—१, चिपळुण व दिवाणी न्यायालय व.स्तर, खेड येथील कॅनन कंपनीचे iR 2625 N या झेरॉक्स मशीनचा Non Comprehensive वार्षिक देखभाल करार करणे शक्य असेल, त्यांनी आपली निविदा खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डवर प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत म्हणजेच दिनांक २३/०२/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून द्यावीत.

## निविदांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह व तारखेसह मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे, त्यामध्ये कर व वस्तूंची किंमत इत्यादी बाबी स्वतंत्र नमुद कराव्यात, तसेच दरपत्रकामध्ये किंवा लेटर हेडवर GST क्रमांक नमुद करावा व पॅनकार्डची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत सादर करावी.

२. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांचे अधिपत्याखालील दिवाणी न्यायालय क.स्तर, खेड, दिवाणी न्यायालय क.स्तर, दापोली, दिवाणी न्यायालय क.स्तर, गुहागर, दिवाणी न्यायालय क.स्तर, लांजा व जिल्हा न्यायालय, रत्नागिरी (अभिलेख कक्ष) येथे पुरविणेत आलेले कॅनन कंपनीचे iR 2006 N हे झेरॉक्स मशीन, तसेच जिल्हा न्यायालय—१, चिपळुण व दिवाणी न्यायालय व.स्तर, खेड येथील कॅनन कंपनीचे iR 2625 N या झेरॉक्स मशीनचा Non Comprehensive वार्षिक देखभाल करार सन २०२६ — २०२७ चे आर्थिक वर्षामध्ये करणेत येणार आहे.

३. झेरॉक्स मशीनबाबत तक्रार दिलेनंतर त्वरीत संबंधीत न्यायालयात हजर होवून तक्रारीचे निवारण करावयाचे आहे अथवा संबंधित मशीनकरिता आवश्यक कंझुमेबल पार्टची त्वरित माहिती कार्यालयाला देणेची आहे.

४. जर एखादया तक्रारीचे निवारण आपण दिलेल्या अटी व शर्तीच्या कालावधीत झाले नाही तर दुस—या सर्व्हीस प्रोव्हायडरला सदरची झेरॉक्स मशीन दुरुस्तीसाठी कळविले जाईल व त्यासाठी येणारा खर्च हा आपल्या देखभाल खर्चामधून वजा केला जाईल.

५. अपवादात्मक परिस्थितीत जेव्हा एखादया झेरॉक्स मशिनचा कंझुमेबल पार्ट्स खराब झाला असेल आणि संबंधित मशिन त्वरित दुरुस्त करणे आवश्यक असेल त्यावेळी Purchase Order ची वाट न पाहता आवश्यक असणारा कंझुमेबल पार्ट्स त्वरित उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

६. तक्रार निवारण करणेसाठी प्रशिक्षीत तज्ञाला पाठविणे आवश्यक आहे. तसेच त्याला झेरॉक्स मशीनबाबतचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

७. जेव्हा सर्व तक्रारीचे निवारण होईल तेव्हाच वार्षिक देखभालीचा खर्च देणेत येईल. सदरचा खर्च हा कर्यालयासाठी पुरविणेत आलेला निधी जेव्हा उपलब्ध होईल तेव्हा देणेत येईल.

८. जर आपणाशी केलेला वार्षिक देखभाल करार हा समाधानकारक नसेल तर सदर वार्षिक देखभाल करार हा कोणतीही आगावू नोटीस न देता रद्द करणेत येईल.

९. वार्षिक देखभाल कराराचा खर्च हा त्रैमासिक पद्धतीने (Quarterly Basis) अदा करणेत येईल. तसेच देखभालीठी आगावू खर्च देण्यात येणार नाही.

१०. झेरॉक्स मशीनसाठी नव्याने पार्ट्स बसविणेचा खर्च वार्षिक देखभाल कराराच्या रक्कमेमध्ये करावा लागणार आहे.

११. संबंधीत झेरॉक्स मशीनच्या पार्ट्सची किंमत बाजारभावापेक्षा जास्त असता कामा नये, त्यासाठी वाहतुक करणे अथवा दुरुस्ती करणेसाठी वेगळा खर्च देणेत येणार नाही.

१२. वार्षिक देखभाल करणेत येणा—या झेरॉक्स मशीनची देखभाल ही संबंधीत न्यायालयांमध्ये प्रत्यक्ष जागेवर जावून करावयाची आहे. त्याचा वाहतुकीचा वेगळा खर्च आकारता येणार नाही किंवा मागणी करता येणार नाही.

१३. महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निविदा भरु नये. अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

१४. सदरची जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयाच्या https://ratnagiri.dcourts.gov.in या संकेतस्थळावरती प्रसिध्द करणेत आलेली आहे

१५. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा.प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील.

आज दिनांक ०९/०२/२०२६ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

DISTRICT COURT OF RATNAGIRI
डिस्ट्रिक्ट कोर्ट, रत्नागिरी

दिनांक— ०९/०२/२०२६

**प्रभारी प्रबंधक,**
**जिल्हा न्यायालय, रत्नागिरी**
म.जा.क्र. वित्त/ ६३७/२०२६
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक:— ०९/०२/२०२६

**<u>प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी—</u>**

१ सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
२ जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.
३ मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, रत्नागिरी.
४ मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.
५ मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
६ मा. तहसिलदार कार्यालय, रत्नागिरी.
७ नगरपरिषद, रत्नागिरी.